सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्र.एक्स-४ मुख्य लेखाशीर्ष “७६१०-शासकीय कर्मचारी इ.ना कर्जे” या लेखाशीर्षातंर्गत निधी वितरीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: मबाआ-२०१९/प्र.क्र.३०/का-७अ
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २८ मे, २०१९.

संदर्भ:- १) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. १ एप्रिल, २०१९.
२) शासन परिपत्रक,महिला व बाल विकास विभाग क्र. बीजीटी- २०१९/प्र.क्र. १४/का-४, दि. १० एप्रिल, २०१८.

प्रस्तावना:

सन २०१९-२० चा अंतरिम अर्थसंकल्प दिनांक २७ फेब्रुवारी,२०१९ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आला. हा अंतरिम अर्थसंकल्प असल्याने अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करुन विनियोजन विधेयक मंजूर होईपर्यंतच्या कालावधीसाठीचा (एप्रिल,२०१९ ते जुलै,२०१९ या चार महिन्यांचा) खर्च भागविण्यासाठी विधानमंडळाने “महाराष्ट्र विनियोजन(लेखानुदान) विधेयक,२०१९” मंजूर केले आहे. त्यानुसार माहे एप्रिल, २०१९ ते माहे जुलै, २०१९ या चार महिन्यांकरिता खर्च भागविण्यासाठी वित्त विभागाने परवानगी दिलेली आहे. त्यानुषंगाने शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग, क्र.बीजीटी-२०१९/प्र.क्र.१४/का-४, दिनांक १० एप्रिल, २०१९ सोबतच्या परिशिष्टानुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१९ ते माहे जुलै, २०१९ या चार महिन्यांकरिता खर्च भागविण्यासाठी लेखानुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार महिला व बाल विकास विभागातंर्गत मुख्य लेखाशीर्ष ७६१०-शासकीय कर्मचारी इ.ना कर्जे या लेखाशीर्षाखाली मंजूर लेखानुदानानुार अनुज्ञेय होणारा निधी वितरित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्रमांक-एक्स-४ मुख्य लेखाशीर्ष ७६१०-शासकीय कर्मचारी इ.ना कर्जे या लेखाशीर्षातर्गत माहे एप्रिल, २०१९ ते माहे जुलै,२०१९ पर्यतंच्या चार महिन्याचा खर्च भागविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या लेखानुदानानुसार व वित्त विभागाच्या दिनांक १.४.२०१९ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार संबधित लेखाशीर्षाखाली सदर शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रामधील स्तंभ क्र-६ मध्ये नमूद केल्यानुसार निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे हे राहतील त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. त्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे यांनी वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-१ येथील दिनांक १.४.२०१९ च्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या तपासणी सूचीतील बाबींची, केंद्र शासनाच्या मागदर्शक सूचनांचे तसेच यासंदर्भात नियोजन विभाग व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित निकष, वित्तीय अधिकाराचे प्रत्यायोजन यांचे काटेकोर पालन करावे.

३. याबाबत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता वरील लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला निधी खर्च होईल व त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे यांनी घ्यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक १.४.२०१९ च्या परिपत्रकामधील तरतुदीच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०५२८११०४५१४२३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: CN = Lalsing Ramchandra Gujar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Women And Child Development Department
Date: 2019.06.06 15:53:59 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
३) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
४) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद (आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
५) सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
६) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी(आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
९) सर्व तालुका कोषागार अधिकारी(आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
१०) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी(आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
११) कार्यासन(व्यय-६/अर्थसंकल्प-७) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) कक्ष अधिकारी(का.४), महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१३) निवड नस्ती-का-७ अ

शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग,क्र.मबाआ-२०१९/प्र.क्र. ३०/का-७अ, दिनांक २८ मे,२०१९ सोबतचे विवरणपत्र सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता वित्त विभागाच्या दिनांक १ एप्रिल,२०१९ च्या शासन परिपत्रकानुसार वितरित करावयाच्या निधीचा तपशील

(रुपये हजारात)

अ.क्र.	योजनेचे नाव	लेखाशीर्ष	अर्थसंकल्पिय अंदाज २०१९-२०	माहे एप्रिल२०१९ ते जुलै,२०१९ साठी वितरणासाठी उपलब्ध अनुदान	या शासन परिपत्रकानुसार वितरित करावयाचा निधी
१	२	३	४	५	६
	मागणी क्र.एक्स ४-७६१० शासकीय कर्मचारी इ.ना कर्जे				
१	(००)(०१) घरबांधणी अग्रिमे (अनिवार्य)	७६१० १४७७			
	५५ कर्जे व आगाऊ रकमा		७००००	२३३३३	१३३३३
२	(००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे(अनिवार्य)	७६१० १४८६			
	५५ कर्जे व आगाऊ रकमा		३६३०	१२१०	१२१०
३	(००)(०१) स्वीय संगणक खरेदी अग्रिमे(अनिवार्य)	७६१० १९३१			
	५५ कर्जे व आगाऊ रकमा		५५००	१८३३	१८३३

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: CN = Lalsing Ramchandra Gujar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Women And Child Development Department
Date: 2019.06.06 15:54:22 +05'30'

(ला.रा.गुजर)

सह सचिव,महाराष्ट्र शासन